# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि.३१/७/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या १३६ या बैठकीचा कार्यवृत्तांत :

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते :-

१. मा.श्री.के.बी.गवळी, .. उप सभापती तथा मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ
२. मा.श्री.विश्वास उपासे. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
३. मा.श्री.मकरंद सावे. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
४. मा.श्री.साहेबराव खरात. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
५. मा.श्री.वामनराव राऊत. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
६. मा.ॲड.श्री.जे.पी.पाटील. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
७. मा.श्री.बबनराव देशमुख. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
८. मा.श्री.चांदपाशा इनामदार .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
९. मा.श्री.राजेश्वर चव्हाण. .. सदस्य/औरंगाबाद मंडळ.
१०.मा.श्री.मोहम्मद मुदस्सीर .. सदस्य प्रतिनिधी.
नगर रचनाकार
उप संचालक नगर रचना कार्यालय,
औरंगाबाद.
११.सहाय्यक अभियंता, म.न.पा. .. सदस्य प्रतिनिधी.
(मा.आयुक्त,म.न.पा.यांचे प्रतिनिधी)

बैठकीचे कामकाज सुरु करण्यापूर्वी, मा.मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा.सदस्य यांना माहिती दिली की, मा.सभापती, औरंगाबाद मंडळ यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते आजच्या १३६ व्या मंडळाच्याबैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत व मा.सभापती यांनी बैठक घेण्याच्या सुचना दिल्यानुसार व म्हाड कायदा १९७६ मधील कलम २५,२६, व २७ नुसार असलेल्या तरतुदीनुसार मुख्य अधिकारी तथा उप सभापती यांचे अध्यक्षतेखाली मंडळाच्या १३६ वी बैठक घेण्यांत येत आहे. त्यानुसार बैठकीस कोरम असल्याची खात्री करुनच बैठक सुरु करण्यांत आली. उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले व रितसर कामकाजास सुरुवात करण्यांत आली.

## विषय क्रं.१ :- दि.१४.६.२००४ रोजी झालेल्या मंडळाच्या १३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

या विषयाच्या बाबतीत मंडळाचे उप अभियंता श्री.पाटील यांनी दि.१४.६.२००४ रोजी १३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याबाबत ठराव निहाय माहिती मंडळास दिली. मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाचा ठराव क्रं.८०० अन्वये ठराव घेण्यांत आला होता की, परभणी येथिल अल्प उत्पन्न गटातील २५ रिक्त गाळे व मध्यम उत्पन्न गटातील १५ रिक्त गाळे हे प्रथम एस.सी/एस.टी/व्ही.जे/एन.टी इ. प्रवर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वाटप करण्याचा प्रयत्न करावा. मागासवर्गीय सहकारी संस्थेंकडून जर प्रतिसाद मिळाला नाही तर न्यु प्रयाग असोसिएटस. परभणी यांना रिक्त गाळे विकण्याचा प्रस्ताव मंडळासमोर ठेवावा व उर्वरित जमिनिवर गृहनिर्माण योजना घेण्यांत यावी व त्याप्रमाणे प्राधिकरणास अहवाल पाठवावा. तथापि, या निर्णयाच्या बाबतीत मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, परभणी येथिल सर्वे नं.५२७ (भाग ) मधिल उर्वरित जमिनिवर गृहनिर्माण योजना राबविण्याचे ठरल्यास तेथे गाळयास मागणी प्राप्त होऊ शकणार नाही कारण याच ठिकाणी कार्यान्वीत केलेल्या योजनेतील फक्त २ गाळेच विक्री झाले आहेत व बाकीचे रिक्त आहेत. रिक्त गाळे वाटपासाठी बरेच प्रयत्न करुनही गाळयास मागणी येत नाही त्यामुळे उर्वरित जमिनिवर विकसित भुखंडाची योजना राबविल्यास तेथे भुखंडास मागणी प्राप्त होऊ शकेल व पर्यायाने जमिनीमधे मंडळाचा अडकलेला निधी मोकळा होऊ शकेल. उर्वरित जमिन गृहनिर्माण योजनेतील गाळयाच्या योजनेसाठी ठेवणेही उचित होणार नाही कारण तेथे गाळयास मागणी मिळू शकणार नाही. त्यामुळे विकसित भुखंडाची योजना राबवून भुखंड विक्रीसाठी योजना मंडळाने मंजूर केल्यास त्याप्रमाणे विकसित भुखंडाच्या योजनेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत येईल. याबाबत मंडळाचे सर्व मा.सदस्य यांनी एकमताने प्रतिपादन केले की, जर गाळयाच्या योजनेस मागणी मिळत नसेल तर व पूर्वी बांधलेले गाळे अदयाप रिक्त पडलेले आहेत याचा विचार करता उपरोक्त ठिकाणी विकसित भुखंडाची योजना राबविल्यास मंडळाची हरकत नाही. तथापि, मा.सभापती यांच्याशी चर्चा करुनच याबाबतचा अंतीम निर्णय ध्यावा असे मंडळाने एकमताने सांगितले. त्याप्रमाणे विकसित भूखंडाच्या योजनेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा असे मंडळाने सर्वानुमते सांगितले.

बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याच्या अनुषंगाने ठराव क्रं.८०१ च्या ठरावा बाबत मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, झरी ( ता.परभणी) व जिंतूर तालूक्यातील देवसडी, चारठाणा, आडगांव व

पुंगळा या ठिकाणी ग्रामीण भागात कलम-५२ खाली जमिनी घेण्यासाठी जमिनीचे मुल्यांकन करण्याविषयीची कारवाई प्रगतीपथावर आहे अशी माहिती मा.मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मंडळाचे मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी सांगितले की, लातूर जिल्हयात ग्रामीण भागात गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी कलम-५२ खाली जमिनी घेण्याचे प्रस्ताव देखील मंडळाचे अधिका-यांनी तयार करुन जमिनी घेण्यासाठीची कारवाई करावी असे प्रतिपादन केले व कलम-५२ खाली जमिनी प्रस्तावित करतेवेळी त्याबाबत मंडळाचे स्थानिक सदस्य यांची संमती घेण्यांत यावी असेही मा.सदस्य यांनी सुचविले.

दि.१४/६/२००४ रोजी झालेल्या मंडळाच्या १३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यासाठी सदर विषयावर वरिल प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ८०३ :-**

**दि.१४/६/२००४ रोजी झालेल्या मंडळाच्या १३५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त चर्चेसह कायम करण्यांत आला.**

**विषय क्रं.२ :- राष्टीय गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत सन २००४-२००५ मधील बांधकाम कार्यक्रम राष्ट्रीय झोपडपटटी सुधार कार्यक्रम व वॅम्बे योजने बाबत आढावा.**

उपरोक्त विषयाच्या बाब टिपणी बाबत खालील प्रमाणे योजनानिहाय योजनेच्या कामाची माहिती व कामाच्या प्रगतीबाबतची माहिती कार्यकारी अभियंता/औरंगाबाद विभाग व लातूर विभाग यांनी मंडळास बैठकीत दिली.

१. मंडळाने सन २००३-२००४ या वर्षामध्ये पुर्ण केलेल्या योजनेची माहिती :-

| अ.क्रं. | योजनेचे नांव | योजनेची सदय:स्थिती. |
|---|---|---|
| १ | ३० बंगले उच्च उ.गट स.न.२७ , शहानुरवाडी, औरंगाबाद. | सदर ३० बंगल्याचे काम अंतीम टप्प्यात आहे. |
| २ | २२जोड बंगले उच्च उ.गट स.न.२७ , शहानुरवाडी, औरंगाबाद. | काम या अगोदरच पुर्ण होवून त्यापैकी २१ जोडबंगल्याचे वाटपही झाले आहे. |
| ३ | १०० गाळे अत्यल्प उ.गट, स.न.१४५ देवळाई, औरंगाबाद. | गाळयांचे काम पुर्ण तथापी विदयुत पुरवठा व पाणीपुरवठयाचे काम पुर्ण झाले नाही माहे ऑक्टो-०४ पर्यंत कामे पुर्ण होतील. |
| ४ | १०० गाळे अल्प उ.गट, स.न.१४५ देवळाई, औरंगाबाद. | गाळयांचे काम पूर्ण तथापि विदयुत पुरवठा व पाणीपुरवठयाचे काम पुर्ण झाले नाही माहे ऑक्टो-०४ पर्यंत कामे पुर्ण होतील. |
| ५ | १२० गाळे अत्यल्प उ.गट,स.नं.५४ भोकरदन, जालना. | गाळे बांधुन पूर्ण झालेले आहेत. नगर परिषदेकडून विदयुतीकरणाचे काम प्रगतीपथावर असून पाणीपुरवठयाचा प्रस्ताव M.J.P कडे सादर केला आहे. |
| ६ | १४९ गाळे अल्प उत्पन्न गट, स.नं.५४ भोकरदन, जालना. | --वरिल प्रमाणे-- |
| ७ | १६६ गाळे अत्यल्प उत्पन्न गट स.न.. १६३ बोरी जि.परभणी. | बांधकाम पुर्ण झाले वाटप प्रक्रिया चालू आहे. |
| ८ | ८६ गाळे अत्यल्प उत्पन्न गट स.न..४५५ मुदखेड नांदेड. | पथदिव्यांचे कामाचे अंदाजपत्रक M.S.E.B.स्तरावर प्रगतीपथावर. रस्ते व पाणीपुरवठा मंडळातर्फे कार्यवी प्रगतीपथावर. |
| ९ | १८ गाळे अल्प उत्पन्न गट, स.न..४५५ मुदखेड नांदेड. | -- वरिल प्रमाणे -- |
| १० | ८५ गाळे अत्यल्प उत्पन्न गटस.न.६७९ अर्धापूर नांदेड | सदर योजनेच्या विदयुतीकरणासाठी एम.एस.ई.बी.ला पैशाचा भरणा केलेला आहे.रस्ते व पाणीपुरवठा मंडळातर्फे करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर. |
| ११ | ४२ गाळे अल्प उत्पन्न गटस.न.६७९ अर्धापूर नांदेड | --वरिल प्रमाणे-- |
| १२ | ३४२ गाळे अत्यल्प उत्पन्न गट स.न.९७, ९८ बाभूळगांव रोड, लातूर. | सदर योजनेचे लाईट व रस्त्याचे काम पुर्ण झाले असुन गाळे वाटपाची प्रक्रीया चालू आहे. |

| | | |
|---|---|---|
| १३ | ५२गाळे हमालमापाडी, स.न.७०१/४ मुरुड लातूर | योजनेतील ४८ घरे पुर्ण झालेली असुन ४ घरांचे बांधकाम कोर्ट स्टे आहे तसेच रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे. पाण्याची व लाईटची व्यवस्था करण्याचे काम चालू आहे. |
| १४ | ५० गाळे अत्यल्प उत्पन्न गट, स.न.७०१/४ मुरुड लातूर | घरे पूर्ण झाली असून वाटप प्रगतीपथावर. |
| १५ | १८८ गाळे अत्यल्प उत्पन्न गट स.न.११३ खांडेश्वरी बीड. | काम संपलेले आहे. ड्रेनेज, पाणीपुरवठयाची तांत्रिक मान्यता दिली आहे. बाहय सुविधांची कामे करण्यासाठी एजन्सी निश्चित करण्यांत येत आहे. तसेच एमएसईबी कडून कोटेशन घेऊन पैसे भरुन काम करण्यांत येत आहे. |

## २. २००४-२००५ या वर्षामधिल बांधकाम कार्यक्रमाची माहिती :-

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेबाबतची सदयस्थिती. |
|---|---|---|
| १ | ९१ मध्यम उ.गट, भुखंड योजना, गट नं.१०४/१ तिसगांव, औरंगाबाद | लेआऊटमध्ये बदल करणे आवश्यक आहे कारण प्लेन टेबल सर्व्हे करण्यांत आला आहे व प्लॉटचे डिमार्केशनही करण्यांत आले आहे. त्यामुळे सदर योजनेस सिडकोची मंजूरी घेऊन योजना सुरु करण्यांत येईल. |
| २ | १४ भुखंड उच्च उत्पन्न गट, गट नं.१०४/१ तिसगांव, औरंगाबाद | -- वरिल प्रमाणे -- |
| ३ | १५रहिवाशी + व्यापारी भुखंड योजना गट नं.१०४/१ तिसगांव, औरंगाबाद | -- वरिल प्रमाणे -- |
| ४ | १०० गाळे अत्यल्प उत्पन्न गट देवळाई, औरंगाबाद. | ६० टक्के काम पुर्ण झाले आहे. |
| ५ | १०० गाळे अल्प उत्पन्न गट देवळाई, औरंगाबाद. | -- वरिल प्रमाणे -- |
| ६ | ११५/५१अत्यल्प उत्पन्न गट आर-१, एम.आय.डी.सी.पैठण. | ९/०४ पर्यन्त योजना पुर्ण होईल व १०/०४ ला गाळे वाटप प्रक्रीया सुरु होईल. |
| ७ | ११ अल्प उत्पन्न गट आर-१, एम.आय.डी.सी.पैठण. | ९/०४ पर्यन्त योजना पुर्ण होईल व १०/०४ ला गाळे वाटप प्रक्रीया सुरु होईल. |
| ८ | १५ अल्प उत्पन्न गट २ गाळे आर-१, एम.आय.डी.सी.पैठण. | जाहिरात देण्यांत आली आहे. |
| ९ | ७० गाळे अल्प उत्पन्न गट, स.न.३०,३१ ( भाग ),कन्नड, औरंगाबाद | ७० पैकी ४९ गाळयांचे काम प्रगतीपथावर आहे व ते १२/०४ पर्यन्त पुर्ण होईल. |
| १० | १७० गाळे अत्यल्प उत्पन्न गट, स.न.३०,३१ ( भाग ),कन्नड, औरंगाबाद | १७० गाळयांचे काम प्रगतीपथावर आहे व ते १२/०४ पर्यनत पुर्ण होईल. |
| ११ | ६ गाळे उच्च उत्पन्न गट,एमआयडीसी पैठण. | ठोस मागणीसाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत. |
| १२ | २०९ अत्यल्प उत्पन्न गट आर-१ एमआयडीसी. पैठण. | म्हाडा फंडस् उपलब्ध असल्याबद्दल वित्त नियंत्रक/प्रा.यांची सहमती घेवून ठोस मागणी बाबत जाहिरात देण्यांत येईल. |
| १३. | ३२ अल्प उत्पन्न गट एमआयडीसी. पैठण. | म्हाडा फंडसउपलब्ध असल्याबद्दल वित्त नियंत्रक/प्रा.यांची सहमती घेवून ठोस मागणी बाबत जाहिरात देण्यांत येईल |
| १४ | ८० अत्यल्प उत्पन्न गट स.न.९७/९८ ( भाग ),बाभूळगांव रोड, लातूर. | मागणी नुसार योजना तयार करण्यांत आले असून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. |
| १५ | ४० अत्यल्प उत्पन्न गट स.न.७०१/४ मुरुड लातूर. | मागणी नुसार योजना तयार करण्यांत येत आहे. |
| १६ | १०० अत्यल्प उत्पन्न गट स.न.२६८ ( भाग ), निलंगा, लातूर. | प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तांत्रिक मान्यता व प्रारुप निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे. |

| | | |
|---|---|---|
| १७ | ९० अत्यल्प उत्पन्न गट स.न.२७४ नरसी-नायगांव नांदेड. | प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.उपमुख्य अभियंता/प्रा.यांचे सहमतीसाठी सादर करण्यांत येत आहे. |
| १८ | ३२गाळे अल्प उत्पन्न गट स.न.२७४ नरसी-नायगांव नांदेड. | प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.उपमुख्य अभियंता/प्रा.यांचे सहमतीसाठी सादर करण्यांत येत आहे. |
| १९ | २५ गाळे अल्प उत्पन्न गट स.न.२६९ मारताळा नांदेड. | सदर योजना विकसित भुखंड योजना घ्यावी म्हणून प्रस्तावित करण्यांत येत आहे. |
| २०. | ५० गाळे अत्यल्प उत्पन्न गट स.न.२६९ मारताळा नांदेड. | सदर योजना विकसित भुखंड योजना घ्यावी म्हणून प्रस्तावित करण्यांत येत आहे. |
| २१ | ५० गाळे अल्प उत्पन्न गट स.न.२३६/२/२नळदुर्ग. | जमिनीचा ताबा प्राप्त झाला नाही ताबा प्राप्त झाल्यानंतर योजना प्रस्तावित करण्यांत येईल. |
| २२ | ५० गाळे अल्प उत्पन्न गट स.न.२३६/२/२नळदुर्ग. | जमिनीचा ताबा प्राप्त झाला नाही ताबा प्राप्त झाल्यानंतर योजना प्रस्तावित करण्यांत येईल. |

## ३. वॅम्बे योजनेची ३०-६-२००४ पर्यंतची माहिती.

| अ.क्रं. | ठिकाण | एकुण गाळे/भूखंड | पुर्ण झालेले गाळे/भुखंड | प्रगतीपथावरील गाळे/भुखंड | बांधकामास सुरुवात न झालेले गाळे/भुखंड. |
|---|---|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | १६० | | ८४ | ७६ |
| २ | परभणी | ८३ | | | ८३ |
| ३ | नांदेड | ८३ | -- | ५३ | ३० |
| ४ | लातूर | १२५ | ७९ | ३२ | १४ |
| ५ | उदगीर | ७३ | ६४ | | ९ |
| ६ | अंबाजोगाई | १८० | १८० | | |
| ७ | उस्मानाबाद | ३९ | -- | १७ | २२ |
| ८ | हिंगोली | ३४ | २७ | ३२ | २ |
| ९ | बीड | | | | |
| १० | परळी वैजिनाथ | | | | |

तसेच वॅम्बे योजनेच्या घरकुलांचा नविन प्रस्ताव मंजूरीस्तव सादर केलेले आहेत त्याची माहिती देखील मंडळास खालील प्रमाणे देण्यांत आली.

१. हिंगोली .. ३९८
२. नांदेड .. ७९५
३. बीड .. ८३२ पैकी १५० मंजूर.
४. अंबेजोगाई. .. ५३२ पैकी १५० मंजूर.

वरील प्रमाणे मंडळास माहिती देण्यांत आली व त्यावर सांगोपांग चर्चा करुन मंडळाने असा निर्णय घेतला की,

**ठराव क्रं.८०४ :**

**उपरोक्त प्रमाणे नमुद केलेल्या योजनेची माहिती व योजनेतील कामाच्या प्रगतीची माहितीची नोंद घेतल्या बाबत मंडळाचे मा.सदस्यांनी सांगितले व सर्व सन्माननीय सदस्यांनी बैठकीत सांगितले की, उपरोक्त योजने अंतर्गत ठरवुन दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मंडळाच्या अधिका-यांनी प्रयत्न करावेत.**

## मा. अध्यक्ष, औरंगाबाद यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :-

### आयत्या वेळेचा विषय क्र. 1 :-

मंडळाचे सदस्य मा. श्री. बबनरावजी देशमुख यांनी विचारणा केली की, बोरी येथिल घरांचे वाटप अदयाप का झालेले नाही ? त्यावर मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, लाभधारकांना गाळा ताब्यात घेण्यापूर्वी रु. 10,648/- चा भरणा करण्याबाबत दि. 19/05/2004 च्या पत्रान्वये कळविलेले आहे मात्र अदयाप एकाही लाभधारकाने भरणा केलेला नाही.

यावर मा. श्री. सावे सदस्य, औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, राज्यातील दुष्काळी परिस्थिती, दुबार / तिबार पेरणीचे संकट लक्षात घेता व योजनेतील बहुतांश लाभधारक हे शेतकरी असल्यामुळे ते पुर्ण रक्कमेचा भरणा करुन, गाळे ताब्यात घेतील असे वाटत नाही. तसेच या गाळेधारकां कडून तीन मासिक हप्त्यां इतकी अनामतही घेण्यांत येऊ नये. मंडळाचे सदस्य मा. श्री. सावे, मा. श्री. खरात व श्री. देशमुख यांनी प्रतिपादन केले की, प्राप्त परिस्थिती पाहता मासिक हप्त्याची अनामत वगळता निम्मी रक्कम म्हणजे अंदाजे रु. 5000/- स्विकारुन लाभधारकांना 1 सप्टेंबर 2004 पासून गाळे ताब्यात दयावेत व उर्वरित रक्कम चार समान हप्त्यात व्याजासह वसूल करण्यांत यावी. जेणे करुन गाळयांचे वाटप त्वरीत होऊ शकेल, गाळयांची मोडतोड / चोरी होणार नाही व म्हाडाचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही.

यावर मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, हा निर्णय मंडळ स्तरावर घेता येणार नाही व विहीत नियमानुसार गाळा ताब्यात घेण्यापूर्वीची रक्कम पूर्णपणे भरणा करणे आवशयक आहे यावर मा. सदस्य श्री. देशमुख यांनी प्रतिपादन केले की, जर मंडळस्तरावर प्रस्तुत कार्यवाही करता येत नसेल तर याबाबत मंडळाचा शिफारस वजा ठराव प्राधिकरणाकडे सादर करुन प्राधिकरणाची मंजूरी त्वरीत घेण्यांत यावी. सदरील मंजुरीबाबतचा प्रस्ताव कार्यवृत्ताचे स्थायीकरणाची वाट न पाहता त्वरीत प्राधिकरणास सादर करावा. श्री. देशमुख यांचे प्रस्तावास सर्व उपस्थित सदस्यांनी पाठींबा दर्शविला. उपरोक्त चर्चे नंतर खालील प्रमाणे ठराव बहुमताने पारीत करण्यांत आला व निर्णय घेतला की,

### ठराव क्र. 805 :

''बोरी, ता. जिंतूर, जि. परभणी येथिल आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता व घरे लवकरात लवकर वाटप करण्याच्या दृष्टीने व म्हाडाचेही कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये यादृष्टीने तुर्त अंदाजे रु. 5000/- चा भरणा करुन घेऊन गाळे लाभधारकांना ताब्यात दयावेत व उर्वरित रक्कम अंदाजे रु. 5000/- चार समान मासिक हप्त्यात, मासिक कर्जाच्या हप्त्या व्यतिरिक्त व्याजासह वसूल करण्यांत यावी.'' करिता मंडळ एकमताने शिफारस करित असून ठरावाचे स्थायीकरणाची वाट न पाहता प्राधिकरणाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात यावा.

### आयत्या वेळेचा विषय क्रं. 2 : स.क्र. 54 भोकरदन जि. जालना येथील 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट व 149 गाळे अल्प उत्पन्न गट योजनेच्या कामाच्या विभागणीस कार्योत्तर मंजूरी देणे बाबत

स.क्र._54 भोकरदन जि.जालना येथील 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट व 149 गाळे अल्प उत्पन्न गट योजनेस मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांचे पत्र क्रं. 4471 दि.10/12/2001 नुसार खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.

| अ.क्रं. | उत्पन्न गट | गाळयांची संख्या. | बांधकाम खर्च प्रति गाळा | प्रकल्पाचीएकुण किंमत. |
|---|---|---|---|---|
| 1. | अत्यल्प उत्पन्न गट | 120 | 37,500/- | 45,00,000/- |
| 2. | अल्प उत्पन्न गट | 149 | 82,000/- | 1,22,18,000/- |
| | | | एकुण .... | 1,67,18,000/- |

उपरोक्त प्रशासकीय मान्यतेच्या पत्रात अट क्रमांक 18 नुसार सदर योजनेचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदारांकडून करवून घेण्यांत येण्यासाठी शासनाच्या / म्हाडाच्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्याविषयी आदेशित करण्यांत आले होते.

तथापि, तत्कालिन कार्यकारी अभियंता / औरंगाबाद मंडळ यांनी पत्र क्रं. 77 व 76 दिनांक 28/1/02 अन्वये योजनेस खालील प्रमाणे विभागुन तांत्रिक मान्यता देण्यांत आली होती.

| अ.क्रं. | उत्पन्न गट | तांत्रिक मान्यता रक्कम. |
|---|---|---|
| 1. | 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट. | 43,42,172/- |
| 2. | 149 गाळे अल्प उत्पन्न गट. | 87,97,358/- |

प्रशासकीय मान्यतेच्या अट क्र. 18 नुसार बेरोजगार अभियंता कंत्राटदारांकडून काम करवून घेतल्यास उपरोक्त कामाचे अठरा 18 तुकडे होऊन व 18 विभागणी केल्यास कामाच्या गुणवत्तेत निश्चितेच फरक पडेल याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रं. 86 दि.30/1/2002 नुसार मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांना सादर करण्यांत आले होते. त्यानुसार कामाच्या प्रारुप निविदा मंजूर करण्यांत येऊन निविदा मागविण्यांत आल्या होत्या.

त्यास अनुसरुन 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट योजनेस श्री. बी.एम. दानवे, कंत्राटदार, जालना यांची 10 टक्के जास्त व 149 गाळे अल्प उत्पन्न गट योजनेस 10 टक्के जास्त दराने निविदा मंजूर करण्यांत आल्या आहेत.

सदर कामे पुर्णत्वाच्या मार्गावर असुन मा.उपमुख्य अभियंता तथा दक्षता व गुणनियंत्रण / प्राधिकरण यांनी उपरोक्त प्रशासकीय मान्यतेतील कामाच्या विभागणीस मंडळाची कार्योत्तर मान्यता घेण्यांत यावी असे त्यांचे दि. 21/1/2004 चे तपासणी अहवालातील निरीक्षण क्र. 2 नुसार सुचित केले आहे.

तरी 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट व 149 गाळे अल्प उत्पन्न गट, स.क्रं. 54, भोकरदन योजनेच्या विभागणीस कार्योत्तर मान्यता देणे विषयी सादर.

या विषयावर सांगोपांग चर्चा होऊन मंडळाने एकमताने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

## ठराव क्रमांक : 806 :

स.क्र.54 भोकरदन जि.जालना येथिल 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट व 149 गाळे अल्प उत्पन्न गट या योजना पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने व कामाच्या गुणवत्तेचा विचार करता सदर 120 गाळे अत्यल्प उत्पन्न गट व 149 गाळे अल्प उत्पन्न गट या विभागणीस मंडळ कार्योत्तर मान्यता प्रदान करित आहे.

## विषय क्रं. 3 : सर्वे क्र.413 (भाग), जालना येथिल 25 गाळे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेस हडको ऐवजी म्हाडा मार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणास प्रस्ताव सादर करणे बाबत.

कार्यकारी अभियंता / औरंगाबाद यांनी याबाबत अशी माहिती दिली की, सदर योजनेची जाहिरात दि. 5/12/1999 ला देण्यांत आली होती. सदर योजने करीताच्या गाळयांची विक्री किंमत रु. 3,87,000/- इतकी असून हडको अंतर्गत उपलब्ध कर्जाची रक्कम रु. 2,60,000/- व कर्जाचा व्याजदर 14 टक्के तसेच मासिक हप्त रक्कम रु. 4,400/- याप्रमाणे जाहिरात देण्यांत आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन 10 टक्के अनामत रक्कमेसह 23 गाळयास ठोस मागणी आलेली आहे. तथापि हडको कर्जास शासन हमी देत नसल्याने प्राधिकरणातर्फे अत्यल्प व अल्प उत्पन्न गटाकरिता 10 टक्के व 12 टक्के व्याज दराने गाळेधारकास कर्जउपलब्ध करुन देण्यांत येत असून मध्यम, उच्च उत्पन्न गट योजना अग्रीम अंशदान ( ॲडव्हान्स कॉन्ट्रीब्युशन ) वर राबविण्यांत येत आहेत.

सदर योजनेच्या जाहिरातीत नमुद केल्यानुसार गाळेधारकास कर्ज उपलब्ध करणे अनिवार्य आहे. सदर योजना अग्रीम अंशदानावर राबविल्यास गाळेधारक ग्राहक मंचास तक्रार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हाडाने 14 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देणे उचित होईल असे वाटते.

करीता 25 गाळे मध्यम उत्पन्न गट योजने करीता "160 प्राधिकरण निधी" अंतर्गत "विशेष बाब" म्हणून प्राधिकरणातर्फे कर्ज उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

यावर सांगोपांग चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्रं. 807 :**

**सर्वे क्र.413 (भाग), जालना येथिल 25 गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेकरिता म्हाडा फंडातून प्रति गाळा रु. 2,60,000/- या प्रमाणे एकुण 65 लक्ष एवढे कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणाकडे शिफारसवजा प्रस्ताव सादर करणे बाबत मान्यता देण्यांत येते.**

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर बैठकीचे मा.अध्यक्ष यांचे परवानगीने मा.सदस्यांनी खालील प्रमाणे मुददे उपस्थित केले :-

1. मा.श्री.सावे व मा.श्री. इनामदार सदस्य यांनी बैठकीमध्ये खालील नमुद गावामध्ये / ठिकाणी जमीनी संपादनासाठी कार्यवाही करण्याचे सुचीत केले. लातूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, रेनापूर तसेच लातूर तालुक्यातील ग्रामीण भागातील खालील गावे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. गंगापूर | 2. शिऊर | 3. अंकोली. | 4. निवडी. |
| 5. मुरुड. | 6. चिंचोली बलनात | 7. गादवड. | 8. बोरी. |
| 9. बाभुळगांव. | 10.चिकुरडा. | 11.काळे-बोरगांव. | 12.तांदुळगा |
| 13. साई | 14.नांदगांव | 15. भिसे- वाघोली. | 16. जवळा बु. |
| 17. ईली-ढोकी | 18.आरबी. | 19.माटेफळ. | 20.चाटा. |
| 21. भोयरा. | 22. चाकुर. | | |

या ठिकाणी ग्रामीण भागात गृहनिर्माण योजनेसाठी कार्यकारी अभियंता यांनी जमिनीची पाहणी करुन आवशयकतेनुसार जमिन संपादनाचे प्रस्ताव सादर करावेत.

1. म्हाडाचे विश्रामगृह बांधणेसाठी लातूर येथे कलम-52 खाली जागा घेण्याची कार्यवाही करावी.
2. उस्मानाबाद येथिल स.नं. 401 व 402 चे जमिनमालक जमीन देण्यास तयार आहेत तेंव्हा कार्यकारी अभियंता यांनी एक आठवडयांत प्रस्ताव दाखल करावा अशा सुचना दिल्या.
3. लातूर येथील कार्यालयासाठी तांत्रिक कर्मचारी वर्ग देणे असे मा.श्री.इनामदार व मा.श्री.सावे यांनी प्रस्तावित केले व याबाबत पुढील प्रमाणे स्टाफची तसेच दोन संगणकाची मागणी केली.

| | | |
|---|---|---|
| 1. कनिष्ठ अभियंता | .. | 4. |
| 2. क्लार्क. | .. | 4. |
| 3. लेखापाल. | .. | 1. |
| 4. शिपाई. | .. | 2. |

याबाबत मुख्य अधिकारी यांनी स्टाफ उपलब्ध होवू शाकणार नाही असे सांगितले असता तसा प्रस्ताव प्राधिकरणास पाठवण्याचे ठरले.

4. नांदेड येथे कार्यालया शेजारी जागा आहे बांधण्यासाठी परवानगी दयावी असे मा.ॲड.श्री.जे.पी.पाटील सदस्य/औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत प्रस्ताव केला. त्याबाबत कार्यकारी अभियंता / लातूर यांनी प्रस्ताव दाखल करावा अशा सुचना मुख्य अधिकारी यांनी दिल्या.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

मुख्य अधिकारी तथा सभेचे अध्यक्ष,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.